# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 — शुक्रवार, दि. १६ जानेवारी, २०२६ — वर्ष - १ अंक - ११४ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


## सुविचार

यशस्वी होण्यासाठी माणसाला मेहनत, सातत्य, सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि अपयशातून शिकण्याची तयारी लागते; कारण ध्येयावर ठाम राहणारा माणूसच यश मिळवतो.

## मतदान प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

**मुंबई:** राज्यातील २९ महापालिकांसाठी सुरू असलेल्या मतदानादरम्यान विरार व मालेगाव येथे बोगस मतदान झाल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. विरारमधील प्रभाग क्रमांक ३ मध्ये महेश राठोड या मतदाराच्या नावावर आधीच मतदान झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितल्याने खळबळ उडाली आणि प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

## सारांश वृत्त

### दिल्लीत प्रौढांच्या बेपत्ता होण्यात वाढ

**नवी दिल्ली :** दिल्लीमध्ये बेपत्ता झालेल्या अल्पवयीन मुलांची संख्या २०२४ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत कमी झाली, कारण प्रौढांच्या बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये वाढ दिसून आली, असे दिल्ली स्टॅटिस्टिकल हँड बुक २०२५ नुसार, जे ८ जानेवारी रोजी सार्वजनिक करण्यात आले. आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये १८ वर्षाखालील एकूण ५,८४६ लोक बेपत्ता झाल्याची नोंद झाली होती, जी २०२३ मध्ये ६,२८४ अल्पवयीन मुलांपेक्षा कमी आहे, जी सुमारे ७ टक्क्यांनी घट दर्शवते.

### तेलंगणामध्ये माओवाद्यांचे आत्मसमर्पण

**नवी दिल्ली :** मध्य हैदराबाद छत्तीसगडमधील बंदी घातलेल्या सीपीआय (माओवादी) च्या दोन सदस्यांनी गुरुवारी तेलंगणातील मुलुगु जिल्ह्यात पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले, असे पोलिसांनी सांगितले. एटुरुनगरमचे एएसपी मनन भट यांच्यासमोर माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले, असे अधिकृत निवेदनात म्हटले आहे. तेलंगणा राज्य सरकार आणि पोलिस विभागाकडून आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना पुनर्वसनाच्या उपाययोजनांबद्दल कळल्यानंतर, संघटनेच्या दोन सदस्यांनी नक्षलवादाचा मार्ग सोडून मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला, असे त्यात म्हटले आहे.

### मध्य प्रदेशचे अधिवेशन पुढील महिन्यात

**भोपाळ :** मध्य प्रदेश विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन १६ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान होणार आहे, असे गुरुवारी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार सांगण्यात आले आहे. राज्यपालांनी मंजूर केलेल्या अधिवेशनाची अधिसूचना येथील विधानसभा सचिवालयाने जारी केली. तथापि, २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा अर्थसंकल्प कधी सादर केला जाईल हे स्पष्ट नव्हते.

## एक्झिट पोलचा अंदाज; ठाकरे बंधू, अजित पवारांना धक्का

# पुणे-मुंबईसह राज्यात महायुतीचाच डंका!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पडली असून आता सर्वांचे लक्ष निकालाकडे लागले आहे. उद्या, १६ जानेवारी रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार असून सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्व निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.

निकालाआधीच मतदानोत्तर सर्वेक्षणांचे, म्हणजेच एक्झिट पोलचे अंदाज समोर येऊ लागले असून त्यातून राज्यातील प्रमुख महापालिकांमधील सत्तासमीकरणांबाबत महत्त्वाचे संकेत मिळत आहेत.

एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार मुंबई महापालिकेत महायुतीकडे स्पष्ट बहुमत जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. २२७ जागांच्या बीएमसीमध्ये महायुती १३० पेक्षा अधिक जागा जिंकू शकते, असा अंदाज आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून सत्तेत असलेल्या ठाकरे गटाला मोठा धक्का बसण्याची चिन्हे दिसत आहेत.

मुंबईनंतर राज्याचे लक्ष लागलेल्या पुणे महापालिकेतही भाजप सत्ताकेंद्रस्थानी येईल, असे चित्र एक्झिट पोलमधून समोर येत आहे. पुणे महापालिकेची निवडणूक अजित पवारांसाठी प्रतिष्ठेची ठरली होती. मात्र, पॉलिटिकल ब्युरो अँड ॲनालिसिस ब्युरो (प्राब) या संस्थेच्या एक्झिट पोलनुसार पुण्यात भाजपला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता आहे. १६२ जागांच्या पुणे महापालिकेत भाजप सुमारे ९१ जागा जिंकेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. याच सर्वेक्षणानुसार अजित पवारांच्या राष्ट्रवादीला सुमारे ४३ जागांवर समाधान मानावे लागू शकते. उद्धव ठाकरे गटाला केवळ ७, तर काँग्रेसला ८ जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेतही भाजपचीच सत्ता येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्येही प्राबने महायुतीच्या बाजूने अंदाज वर्तवला होता आणि प्रत्यक्ष निकालात महायुतीला अपेक्षेपेक्षा मोठे यश मिळाले होते. त्यामुळे आता महापालिका निवडणुकांतील हा अंदाज कितपत खरा ठरतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

एक्झिट पोलचे हे आकडे ठाकरे बंधूंसह अजित पवारांसाठी धक्कादायक मानले जात असून, प्रत्यक्ष निकालातूनच राज्यातील महानगरपालिकांतील सत्तेचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे, असे राजकीय विश्लेषकांनी नमूद केले आहे. हे आकडे विरोधकांना धक्कादायक ठरले आहेत.

# गुजरातजवळ पाकिस्तानी नौकेची घुसखोरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजकोट :** गुजरात किनारपट्टीलगत आंतरराष्ट्रीय सागरी सीमारेषेजवळ भारतीय तटरक्षक दलाने महत्वाची कारवाई करत पाकिस्तानी मच्छिमारांची नौका पकडली. या नौकेवरील ९ पाकिस्तानी खलाशांना ताब्यात घेण्यात आले असून पुढील चौकशीसाठी त्यांना पोरबंदर येथे आणण्यात आले आहे.

अरबी समुद्रात बुधवारी रात्री तटरक्षक दलाचे जहाज नियमित गस्त घालत असताना भारतीय सागरी हद्दीत एक संशयास्पद पाकिस्तानी नौका शिरल्याचे जवानांच्या निदर्शनास आले. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन तटरक्षक दलाने तातडीने कारवाई करत नौकेकडे मोर्चा वळवला आणि इशारा दिला.

इशारा मिळताच पाकिस्तानी मच्छिमारांनी नौका माघारी नेण्याचा प्रयत्न केला. मात्र तटरक्षक दलाच्या जहाजाने ती नौका रोखून ताब्यात घेतली. त्यानंतर नौकेसह सर्व खलाशांना पोरबंदर बंदरात आणण्यात आले.

पोरबंदर येथे नौका आणि खलाशांना स्थानिक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर नौका केवळ मासेमारीसाठी भारतीय हद्दीत आली होती की यामागे अन्य काही उद्देश होता, याची सखोल चौकशी करण्यात येणार आहे. पाकिस्तानी नौकेची भारतीय सागरी हद्दीतील अवैध घुसखोरी भारतीय यंत्रणांनी गंभीरपणे घेतली असून, ताब्यात घेण्यात आलेल्या खलाशांची कसून चौकशी होणार आहे. या चौकशीत स्थानिक पोलिसांसह इतर केंद्रीय सुरक्षा यंत्रणाही सहभागी होण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. पाकिस्तानी नौका मासेमारीच्या उद्देशाने आली होती का याचा तपास पोलीस करतील.

# वगळलेल्या नावांची यादी जाहीर करण्याचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केरळमध्ये राबवण्यात आलेल्या विशेष सघन पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रियेनंतर प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या मतदारांची नावे सार्वजनिक करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी निवडणूक आयोगाला दिले.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने केरळमधील एसआयआर प्रक्रियेला आव्हान देणाऱ्या विविध याचिकांवर सुनावणी घेतली. या वेळी न्यायालयाने आक्षेप नोंदवण्यासाठी दिलेली मुदत किमान दोन आठवड्यांनी वाढवण्याचा विचार करण्याची सूचनाही निवडणूक आयोगाला केली. याचिकाकर्त्यांच्या वतीने युक्तिवाद करताना सांगण्यात आले की, नव्या प्रारूप मतदार यादीतून सुमारे २४ लाख मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. मात्र, नेमकी कोणाची नावे काढण्यात आली याची अधिकृत व स्पष्ट यादी उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना आक्षेप नोंदवणे अशक्य झाले आहे.

खंडपीठाने निरीक्षण नोंदवत सांगितले की, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्यामुळे मतदार मोठ्या अडचणीत सापडले आहेत. यावर उपाय म्हणून वगळलेल्या मतदारांच्या याद्या ग्रामपंचायत कार्यालये तसेच गावांतील महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी प्रसिद्ध करण्याचे आदेश देण्यात आले. याशिवाय, या याद्या निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर तातडीने अपलोड करण्याचे निर्देशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

## निवडणूक आयोगाचे सविस्तर स्पष्टीकरण

# राज्यात सर्वत्र शाईपासून यंत्रांपर्यंतचा वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महापालिका निवडणुकांतील मतदान प्रक्रियेवरून उपस्थित केले जाणारे आक्षेप फेटाळून लावत राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट शब्दांत भूमिका मांडली आहे. मतदानासाठी वापरण्यात आलेली शाई ही भारत निवडणूक आयोगाकडून वापरली जाणारीच 'इंडेलिबल इंक' असल्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले. या शाईमध्ये कोणताही वेगळा किंवा संशयास्पद घटक नसून, दुबार मतदानाला वाव मिळाल्याचा आरोप पूर्णतः चुकीचा असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिका निवडणुकांमध्ये शाईऐवजी मार्कर पेन वापरल्यामुळे मतदानाची खूण सहज निघून जाते आणि त्यामुळे दुबार मतदान शक्य होते, असा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. या आरोपांना उत्तर देताना वाघमारे म्हणाले की, राज्य निवडणूक आयोग २०११ पासून मार्कर पेनच्या स्वरूपात हीच शाई वापरत आहे. शाई लावल्यानंतर ती कोरडी होण्यासाठी साधारण १० ते १२ सेकंद लागतात. एकदा शाई पूर्णपणे सुकली की ती कोणत्याही प्रकारे काढता येत नाही.

आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून 'कोरेस' कंपनीचेच मार्कर पेन वापरत असून, अन्य कोणत्याही कंपनीची शाई वापरलेली नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. नेलपेंट रिमूव्हर, हँडवॉश किंवा इतर रसायनांनी ही शाई पुसली जाते, हे दावे चुकीचे असून काही राजकीय नेते जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

दरम्यान, पाडू (पीएडीयू) यंत्राबाबत उपस्थित केलेल्या आक्षेपांवरही वाघमारे यांनी सविस्तर भूमिका मांडली. पाडू हे यंत्र काही नवीन नसून २००४ पासून ते वापरात असल्याचे त्यांनी सांगितले. हे केवळ एक सहाय्यक डिस्प्ले युनिट आहे. तांत्रिक कारणांमुळे कंट्रोल युनिटमधील माहिती स्पष्टपणे दिसत नसेल, तर पाडूच्या माध्यमातून मिरर डिस्प्लेवर ती माहिती वाचता येते. ज्या ईव्हीएम मॉडेल्सना व्हीव्हीपॅटची आवश्यकता नाही, तिथेच आणि तेही अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत पाडूचा वापर करण्यात येतो, असे त्यांनी स्पष्ट केले. सुमारे दोन टक्के ईव्हीएममध्ये बिघाड झाल्याचे मान्य करताना त्यांनी सांगितले की, ही यंत्रे जुनी असून गेल्या दहा वर्षांत नवीन ईव्हीएम खरेदी करण्यात आलेल्या नाहीत. बिघाड आढळलेल्या यंत्रांची तत्काळ बदली करण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या आरोपांनाही त्यांनी ठामपणे नकार दिला. आयोग सत्ताधाऱ्यांना मदत करत असल्याचा कोणताही आरोप तथ्यहीन असून आम्ही कोणावरही पक्षपाती भूमिका घेत नाही, असे वाघमारे म्हणाले. जाणीवपूर्वक खोटे नॅरेटिव्ह उभे केले जात असून सर्व दोष निवडणूक आयोगावर ढकलले जात आहेत, असा आरोपही त्यांनी केला. मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याच्या उद्देशाने चुकीच्या पद्धतीने व्हिडिओ रेकॉर्ड करून प्रसारित करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

मतदार यादीबाबत बोलताना वाघमारे यांनी मतदारांची जबाबदारीही अधोरेखित केली. मतदार यादीत आपले नाव आहे की नाही, हे तपासणे ही मतदारांचीही जबाबदारी आहे. ८५ टक्क्यांहून अधिक मतदारांना वोटर स्लिप देण्यात आल्या असून, 'मताधिकार' ॲप किंवा पोर्टलवरूनही नाव तपासण्याची सुविधा उपलब्ध होती. मतदान केंद्रांवर बीएलओ उपस्थित असून, तेथेही मतदार क्रमांकाची माहिती मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

# आंतरराष्ट्रीय सायबर क्राईमचा पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू :** शहरातील २२ वर्षीय बीकॉम ड्रॉपआउट मोहम्मद उझैफने सुरू केलेल्या अत्याधुनिक सायबर क्राईम ऑपरेशनचा पर्दाफाश झाला आहे. पोलिसांच्या विशेष पथकाने मोहम्मद उझैफ आणि त्याच्या आई सबना अब्दुल बारी यांना अटक केली. चौकशीत उझैफने दुबईस्थित एका भारतीय ऑपरेटरसाठी काम करताना हजारो बेकायदेशीर बँक खात्यांचे व्यवस्थापन करून दरवर्षी २५ लाख रुपयांपेक्षा जास्त कमाई केली असल्याचे उघड झाले.

पोलिसांच्या माहितीनुसार, उझैफ आणि त्याची आई जवळपास ४,२०० बँक खात्यांचे व्यवस्थापन करत होते आणि या खात्यांद्वारे सुमारे २४ कोटी रुपये वळवले गेले. छोट्या स्तरावर सुरू झालेले हे ऑपरेशन लवकरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नेटवर्कमध्ये रूपांतरित झाले, ज्यातून शेकडो कोटींचा गंडा हाताळला गेला. दिल्लीतील नऊ सहयोगींनाही अटक करण्यात आली, ज्यांनी या खात्यांवर नियंत्रण ठेवण्यास, लिंक्ड डेबिट कार्ड वापरून पैसे काढण्यास आणि परदेशात कार्ड पाठवण्यास मदत केली होती.

बेंगळुरू पोलिस आयुक्त सीमांत कुमार सिंह म्हणाले की, या नेटवर्कचा संबंध भारतभरातील किमान ८६४ सायबर गुन्ह्यांशी आहे आणि जवळपास ९,००० खाती हाताळली गेली, ज्यामधील २४० कोटी रुपयांचे व्यवहार गोठवले गेले आहेत. या कारवाईचा मुख्य सूत्रधार प्रेम तनेजा म्हणून ओळखला जातो, जो दुबईस्थित भारतीय बुकी आहे आणि आयपीएल स्पॉट-फिक्सिंग प्रकरणात अटक केलेला होता, परंतु सध्या फरार आहे.

छापेमारी दरम्यान पोलिसांनी २४२ डेबिट कार्ड, ५८ मोबाईल फोन, ५३१ ग्रॅम सोन्याचे दागिने, ४.९ लाख रुपये रोख, नऊ मनगटी घड्याळे, ३३ चेकबुक, २१ पासबुक, डिजिटल पेमेंट रिंग आणि क्रिप्टोकरन्सीशी संबंधित रेकॉर्ड जप्त केले. उझैफ आणि त्याची आई सरकारी रुग्णालये आणि महाविद्यालयांमध्ये लोकांना २००० ते ५००० रुपयांच्या कमिशनच्या बदल्यात बँक खाती उघडण्यास भाग पाडत होते. खात्यांचे पासबुक, डेबिट कार्ड, चेकबुक आणि सिम कार्ड दिल्लीतील सहकाऱ्यांना दिले जात होते, जे पुढील व्यवहार आणि परदेशात पैसे हस्तांतरित करण्याचे काम पाहत होते.

# भाजपकडून राज्यात कपटाचे राजकारण: काँग्रेस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे कपटपूर्ण राजकारण करत आहेत, ज्यामुळे राज्याचे रूपांतर दुसऱ्या बिहारमध्ये होऊ शकते, असे महाराष्ट्र काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. दरम्यान भाजपने सपकाळ यांचे आरोप फेटाळून लावत, त्यांना राज्यातील काँग्रेसमधील गटबाजी हाताळण्याचा सल्ला दिला आहे.

एका पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ म्हणाले, भाजपने आणि फडणवीस यांनी महाराष्ट्राचे राजकीय वातावरण दूषित केले आहे. भाजपने महाराष्ट्रात एक विषारी तण वाढवले आहे. जागरूक नागरिकांनी ते ओळखले पाहिजे आणि आगामी नगरपालिका निवडणुकांमध्ये ते उपटून टाकले पाहिजे. या कपटपूर्ण राजकारणामुळे महाराष्ट्राचे रूपांतर दुसऱ्या बिहारमध्ये होईल. त्यांनी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांच्या उमेदवारांवरील हिंसाचाराचाही उल्लेख केला आणि आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ काही घटनांचा दाखला दिला. सपकाळ यांना उत्तर देताना, भाजपचे प्रदेश प्रवक्ते अजित चव्हाण म्हणाले की, सपकाळ यांचा त्यांच्याच पक्षात आदर नाही. सपकाळ यांनी आधी आपले घर सांभाळावे. राज्य काँग्रेसमधील अनेक गट त्यांचा आदर करत नाहीत आणि त्यांचे ऐकतही नाहीत, असे म्हटले.

# उत्साह असूनही मतदानाचा टक्का कमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी गुरुवारी सकाळपासूनच मतदानाची प्रक्रिया उत्साहात सुरू झाली. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूरसह सर्वच प्रमुख शहरांमध्ये मतदारांनी सकाळीच मतदान केंद्रांकडे वाट धरली. ज्येष्ठ मतदार मतदानासाठी बाहेर पडले, तर पहिल्यांदाच मतदानाचा अधिकार बजावणाऱ्या 'झेन झी' पिढीतील तरुण-तरुणींमध्येही उत्साह दिसून आला. मात्र, काही प्रमुख शहरांमध्ये मतदानाची टक्केवारी अपेक्षेपेक्षा कमी राहिल्याचे स्पष्ट झाले.

मुंबईत दुपारी ३.३० वाजेपर्यंत सरासरी ४१.०८ टक्के मतदानाची नोंद झाली होती.

राज्यात तब्बल नऊ वर्षांनंतर झालेल्या महापालिका निवडणुकांमध्ये यंदा अनेक ठिकाणी मतदानाचा टक्का घसरल्याचे चित्र दिसत आहे. सोलापूर महापालिकेतही मतदान अपेक्षेपेक्षा कमी राहण्याची चिन्हे असून, एकूण मतदान ५२ ते ५५ टक्क्यांदरम्यान राहील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. दुपारी ३.३० वाजेपर्यंत टक्केवारी पुढीलप्रमाणे होती. बृहन्मुंबई महानगरपालिका ४१.०८ टक्के, ठाणे ४३.९६, कल्याण-डोंबिवली ३८.६९, नवी मुंबई ४५.५१, उल्हासनगर ३४.८८, भिवंडी-निझामपूर ३८.२१, मीरा-भाईंदर ३८.३४, वसई-विरार ४५.७५, पनवेल ४४.०४, नाशिक ३९.६४, मालेगाव ४६.१८, धुळे ३६.४९, जळगाव ३४.२७, अहिल्यानगर ४८.४९, पुणे ३६.९५, पिंपरी-चिंचवड ४०.५०, सोलापूर ४०.३९, कोल्हापूर ५०.८५, सांगली-मिरज-कुपवाड ४१.७९, छत्रपती संभाजीनगर ४३.६७, नांदेड-वाघाळा ४२.४७, लातूर ४३.५८, परभणी ४९.१६, अमरावती ४०.६२, अकोला ४३.३५, नागपूर ४१.२३, चंद्रपूर ३८.१२, इचलकरंजी ४६.२३ आणि जालना ४५.९४ टक्के.

## सी. डी. देशमुख यांच्यानंतर डॉ. माधवराव गाडगीळ यांच्याबाबतीतला विदारक अनुभव

# महाराष्ट्रातील ज्येष्ठांच्या उपेक्षेची परंपरा आजही कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** मुंबईवर अनेकांचे डोळे होते, आजही आहेत. पण इतिहास सांगतो की केवळ डोळे असून उपयोग नसतो; निर्धार, संघर्ष आणि त्याग लागतो. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात मुंबईसाठी १०५ मराठी माणसांनी प्राणांची आहुती दिली. या रक्तरंजित संघर्षाच्या सावलीतच एक वेगळी, पण तितकीच महत्त्वाची घटना घडली.

रोह्याचे सुपुत्र चिंतामणराव देशमुख यांनी केंद्रीय अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिला. सत्तेच्या शिखरावर असताना मुंबई महाराष्ट्रात यावी, या भूमिकेसाठी पदाचा त्याग करण्याचे धैर्य त्यांनी दाखवले. त्या क्षणी महाराष्ट्राने त्यांना डोक्यावर घेतले. आचार्य अत्रे यांनी त्यांना 'महाराष्ट्राचा कंठमणी' म्हटले, ते उगाच नव्हते.

सी. डी. देशमुख म्हणजे केवळ राजकीय भूमिका घेणारे नेते नव्हते. ते रिझर्व्ह बँकेचे पहिले गव्हर्नर होते, पद्मविभूषण आणि मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित होते. जगातील अनेक विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट देऊन गौरवले. ज्ञान, प्रशासन आणि मूल्यनिष्ठा यांचा दुर्मीळ संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. आज त्यांची जयंती असताना हा सारा गौरव आठवतो, पण त्याचबरोबर एक अस्वस्थ करणारी जाणीवही होते.

अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर देशमुख यांच्या वाट्याला उपेक्षाच आली. आयुष्याची अखेरची वर्षे त्यांनी हैदराबादमध्ये एकाकीपणात काढली. २ ऑक्टोबर १९८२ रोजी तेथे त्यांचे निधन झाले. नोंदी सांगतात की त्यांच्या अंत्ययात्रेला मोजकेच लोक होते. देशाचे पहिले अर्थमंत्री, पद्मविभूषण सन्मानित व्यक्ती असूनही शासकीय मानवंदना मिळाली नाही, शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले नाहीत.

अलीकडे ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. माधवराव गाडगीळ यांच्या अंत्ययात्रेला फारसे लोक नव्हते, यावर चर्चा झाली. पण समाजासाठी आयुष्य झिजवणाऱ्या विद्वानांच्या वाट्याला अशी उपेक्षा येणे हे अपवादात्मक नाही, तर आपली पद्धतच आहे. सी. डी. देशमुख यांचे आयुष्य त्याचे ठळक उदाहरण ठरते. दिल्ली आणि मुंबई ही त्यांची कर्मभूमी; निधन हैदराबादेत झाले, म्हणून महाराष्ट्राने दुर्लक्ष केले, असा युक्तिवाद कोणी करेल. पण प्रश्न आहे तो कृतज्ञतेचा. रायगड जिल्ह्यातील तळा येथे त्यांचे घर आहे. तेथे स्मारक उभारण्याच्या घोषणा झाल्या, पण पुढे त्या घोषणांचे काय झाले, याचे उत्तर कुणाकडे नाही. ते घर आजही उभे आहे, जणू आपल्या विस्मरणाची साक्ष देत. मुंबईतही त्यांच्या स्मरणार्थ एखादे ठोस स्मारक उभे राहिले नाही. महाराष्ट्राच्या अस्मितेची चर्चा निघाली की देशमुखांचा बाणेदारपणा आठवतो; पण त्या त्यागाच्या मोबदल्यात आपण त्यांना काय दिले, हा प्रश्न मात्र टाळला जातो.

आपण महापुरुषांकडे पाहताना त्यांचे कार्य मोजत नाही, तर त्यांची 'उपयुक्तता' तपासतो. कोणत्या जातीचा जन्म, त्या जातीची मतसंख्या किती यावर सार्वजनिक स्मृती ठरते. रोह्यात त्यांच्या नावावर साधा नगरसेवकही निवडून येणार नसेल, तर स्मारक उभारून काय उपयोग, असा कोरडा व्यवहार्य विचारही या उपेक्षेमागे दडलेला असू शकतो. सी. डी. देशमुख यांची जयंती म्हणजे केवळ अभिवादनाची औपचारिकता नाही. ती प्रश्न विचारण्याची संधी आहे. आपण आपल्या विद्वानांना, मूल्यनिष्ठ प्रशासकांना आणि निःस्वार्थ सेवकांना त्यांच्या हयातीत आणि मृत्यूनंतरही किती न्याय देतो? या प्रश्नाचे उत्तर शोधल्याशिवाय 'महाराष्ट्राचा स्वाभिमान' ही संकल्पना केवळ शब्दांपुरतीच उरेल.

# मतदान अधिकाऱ्याच्या मोबाईलमध्ये भाजपचे ॲप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** निवडणूक आयोगाने १ लाख ८० हजार मतदार कापल्याचे आमच्या डेटामध्ये आले आहे. मतदानाच्या नावाखाली अशा प्रकारे नागरिकांना वेठीस धरले जात आहे. त्यांचा संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकारच हिरावून घेतला जात असेल तर मग घटनात्मक संस्था कशी?, असा सवालही करत मुंबईत काही ठिकाणी निवडणूक अधिकारी देखील भाजपचा प्रचार करत आहेत. मतदान अधिकारी यांच्या फोनवर भाजपचे मेसेजेस मदत करत होते, असा आरोप शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी गुरूवारी माध्यमांशी बोलताना केला.

मुंबईमध्ये गणेश नाईकांना मतदान करण्यासाठी एक तास फिरावे लागले. निवडणूक आयोगाचा हा चुकीचा कारभार समोर आला. वर्षानुवर्षे गणेश नाईक जिथे मतदान करतात ते न करता थेट वाशीला जावे लागले. त्यांच्यामध्ये मी दोन-चार रील्स पाहिल्या होत्या; त्यांचे मन व्यक्त करत असताना आणि मला खात्री आहे की त्यांच्या मनात आहे ते करून दाखवतील.

अनेक असे मतदार आहेत ज्यांना मतदानाची रिसीट मिळाली, मात्र मतदान यादीमध्ये तिथे पोहोचल्यानंतर नाव नाही. अनेकांची नावे जी आहेत ती स्कॅन केल्यानंतर पंधरा-पंधरा नावे दिसून येतात, असे देखील दिसले, असे दावे करीत आदित्य ठाकरे यांनी सरकार आणि निवणूक आयोगावर निशाणा साधला.

## संपादकीय

# मतदानाआधीच आरोपांची राळ

**महापालिका निवडणुकांचे मतदान सुरू असतानाच निवडणूक आयोगावर आरोपांची सरबत्ती सुरू झाली आहे. पराभवाची भीती वाटू लागली की प्रक्रिया संशयास्पद ठरवण्याची जुनीच सवय पुन्हा दिसू लागली आहे. हा लोकशाहीचा मोठा उत्सव शांततेत पार पडू देण्याची जबाबदारी राजकारण्यांचीच आहे, याचा विसर पडू नये.**

आज महाराष्ट्रातील महापालिकांसाठी मतदान सुरू असताना राजकारणाचा सूर पुन्हा एकदा नेहमीच्या वाटेवर गेला आहे. मतदान हा लोकशाहीचा उत्सव असतो, असे सांगत आपण दरवेळी मोठे शब्द वापरतो; पण प्रत्यक्षात तो उत्सव शांतपणे पार पडू न देण्याची जबाबदारी राजकीय पक्ष स्वतःहून घेताना दिसतात. निकाल जाहीर होण्याआधीच पराभवाची कारणे शोधण्याची लगबग सुरू झाली की, लोकशाही प्रक्रियेवरच अविश्वासाची सावली पडते. ठाकरे बंधूंनी निवडणूक आयोगावर केलेले आरोप याच पार्श्वभूमीवर पाहावे लागतील. निवडणूक आयोग ही कोणत्याही लोकशाही व्यवस्थेतील सर्वांत महत्त्वाची, पण तितकीच संवेदनशील संस्था. तिच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे हा लोकशाही हक्क असला, तरी तो हक्क केव्हा आणि कसा वापरायचा याचे भानही तितकेच आवश्यक. मतदानाच्या दिवशीच आयोगावर संशयाचे बोट रोखणे, शाई फिकी पडते, मतदान पुन्हा होऊ शकते, व्यवस्था सत्ताधाऱ्यांच्या बाजूने झुकलेली आहे, असे आरोप करणे हे केवळ प्रश्न विचारणे नसते; तर मतदारांच्या मनात शंका निर्माण करण्याचा प्रयत्न असतो. हा प्रयत्न नकळत का होईना, पण लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा ठरतो. ठाकरे बंधूंच्या भूमिकेचा इतिहास पाहिला, तर संस्थांवर अविश्वास दाखवण्याची त्यांची ही पहिलीच वेळ नाही. कधी ईव्हीएमवर संशय, कधी मतदार याद्यांवर आरोप, तर कधी प्रशासनावर बोट. प्रत्येक निवडणुकीत नव्या स्वरूपाचे आक्षेप पुढे येतात. प्रश्न असा की, हे आक्षेप निवडणुकीआधी सातत्याने का मांडले जात नाहीत? आयोगाकडे तक्रारी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे, निरीक्षक आहेत, न्यायालयाचे दरवाजे खुले आहेत. मग मतदान सुरू झाल्यावरच हे सगळे का आठवते? राजकारणात पराभव ही अपरिहार्य गोष्ट आहे. पण तो स्वीकारण्याची मानसिक तयारी अनेक नेत्यांकडे नसते. विजय हा स्वतःच्या कर्तृत्वाचा परिणाम आणि पराभव हा नेहमीच यंत्रणेचा दोष, अशी सोयीस्कर मांडणी केली जाते. महापालिका निवडणुकांमध्ये स्थानिक प्रश्न, विकासाचे दावे, उमेदवारांची गुणवत्ता, पक्षसंघटना यांचा प्रभाव निर्णायक असतो. या सगळ्या पातळ्यांवर आत्मपरीक्षण करण्याऐवजी थेट आयोगालाच दोष देणे हे राजकीय सोयीचे असले, तरी लोकशाहीदृष्ट्या धोकादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आरोपांना दिलेले उत्तरही त्याच राजकीय भाषेतले असले, तरी त्यामागचा मुद्दा विचार करण्यासारखा आहे. पराभवाची भीती वाटू लागली की आधीच कारणे तयार ठेवण्याची परंपरा आपल्या राजकारणात जुनी आहे. निकाल आपल्या बाजूने आला तर प्रक्रिया योग्य ठरते; उलट निकाल लागला, की तीच प्रक्रिया संशयास्पद ठरते. हा दुटप्पीपणा लोकशाहीची विश्वासार्हता कमी करतो. मतदार हा या सगळ्या खेळाचा केंद्रबिंदू आहे. त्याच्या मनात माझे मत मोजले जाईल का?, माझ्या मतदानाला अर्थ आहे का? अशी शंका निर्माण झाली, तर लोकशाहीच्या पायालाच हादरे बसतात. संस्थांवर प्रश्न विचारताना ही जबाबदारी लक्षात ठेवली पाहिजे. आयोग परिपूर्ण नाही, त्याच्या निर्णयांवर टीका होऊ शकते; पण ती टीका तथ्याधारित, वेळेत आणि योग्य मंचावर झाली पाहिजे. आजची निवडणूक ही सत्तेची चढाओढ नाही; तर ती लोकशाही परिपक्वतेची चाचणी आहे. पराभवाची भीती वाटत असेल, तर त्याचे उत्तर आरोपांत नाही, तर जनतेत आहे. जनतेचा कौल आपल्याला मान्य आहे, एवढे सांगण्याचे धैर्यच लोकशाही नेतृत्व दाखवते. अन्यथा, प्रत्येक निवडणूक ही संशय, आरोप आणि अविश्वासाच्या चक्रात अडकत जाईल आणि त्याची किंमत अखेरीस सगळ्यांनाच मोजावी लागेल.

# भारत-युरोप दिलासादायक संबंध!

**जग दबावाच्या राजकारणाकडे जात असताना भारत आणि युरोप यांचे संबंध व्यापारापुरते मर्यादित राहू शकत नाहीत. नियमाधारित जागतिक व्यवस्था, परस्पर विश्वास आणि सामरिक स्वायत्तता या तिन्हींचा समतोल साधणारी भागीदारीच आजच्या अस्थिर काळात खरे महत्त्व प्राप्त करते.**



आजचे जागतिक राजकारण हे थेट लढाया आणि उघड घोषणांपेक्षा दबाव, निर्बंध, आर्थिक शस्त्रे आणि तंत्रज्ञानाच्या आधारे खेळले जात आहे. कुणी युद्ध पुकारत नाही, पण सर्वत्र युद्धाचीच भाषा आहे. अशा काळात "तटस्थता" हा शब्द हळूहळू कालबाह्य ठरत असताना, नियमांवर आधारित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे महत्त्व नव्याने अधोरेखित होत आहे.

भारत आणि युरोप या दोन भिन्न इतिहास, संस्कृती आणि राजकीय प्रवास असलेल्या घटकांनी याच मुद्द्यावर एकमेकांकडे पाहणे, ही काळाची गरज बनली आहे. युरोप आज स्वतःच्याच अंतर्विरोधांत अडकलेला आहे. रशिया-युक्रेन संघर्षानंतर सुरक्षिततेचा प्रश्न, ऊर्जा पुरवठ्याचे संकट, स्थलांतराचा दबाव आणि अमेरिकेवर असलेले अवलंबित्व या सगळ्यांनी युरोपला आत्मपरीक्षण करायला भाग पाडले आहे. 'सामरिक स्वायत्तता' हा शब्द युरोपियन चर्चांमध्ये वारंवार ऐकू येतो, पण तो प्रत्यक्षात उतरवणे अवघड ठरत आहे. अशा वेळी भारतासारख्या उदयोन्मुख, पण स्वतःची भूमिका स्पष्टपणे मांडणाऱ्या देशाशी जवळीक वाढवणे, युरोपसाठी केवळ पर्याय नाही तर गरज बनते. भारताची स्थिती मात्र वेगळी आहे. भारत कोणाच्याही गटात पूर्णपणे अडकू इच्छित नाही. रशियाशी पारंपरिक संबंध, अमेरिकेशी वाढती जवळीक, चीनशी तणावपूर्ण शेजार आणि जागतिक दक्षिणेतील नेतृत्वाची महत्त्वाकांक्षा या सगळ्यांमध्ये भारताने 'सामरिक स्वायत्तता' हे धोरण जपले आहे. भारताला नियमाधारित जागतिक व्यवस्था हवी आहे, पण ती कोणाच्या दबावाखाली नाही, तर परस्पर संमतीतून घडलेली असावी, ही त्याची भूमिका आहे. याच भूमिकेमुळे भारत आणि युरोप यांच्यात संवादाची एक समान भाषा सापडू शकते. व्यापार हा या नात्याचा एक महत्त्वाचा भाग आहे, पण तोच सर्वकाही नाही. युरोप हा भारताचा मोठा व्यापार भागीदार आहे, तसेच तंत्रज्ञान, भांडवल आणि नियमनाच्या बाबतीत युरोपकडे प्रचंड अनुभव आहे. भारताकडे तरुण लोकसंख्या, वाढती बाजारपेठ आणि डिजिटल क्षमतांचा वेग आहे. हे नाते जर केवळ आयात-निर्यातीपुरते मर्यादित राहिले, तर त्याची ताकद वाया जाईल. त्याऐवजी पुरवठा साखळी, हरित ऊर्जा, डिजिटल नियम, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रांत दीर्घकालीन सहकार्य उभे राहिले, तर त्याचा परिणाम जागतिक पातळीवर जाणवू शकतो. मात्र, हे सगळे घडताना काही कडू प्रश्न टाळता येणार नाहीत. युरोप रशियाच्या बाबतीत कठोर भूमिका घेतो, तर भारत व्यवहार्य धोरण स्वीकारतो. मानवी हक्क, लोकशाहीचे निकष आणि पर्यावरणीय अटी यावरूनही दोन्ही बाजूंमध्ये मतभेद आहेत. पण परिपक्व नात्याची खरी कसोटी मतभेद टाळण्यात नाही, तर ते हाताळण्यात असते.

नियमाधारित संबंध याचा अर्थ एकमेकांवर नियम लादणे नव्हे, तर नियमांची व्याख्या एकत्र बसून करणे, हा असतो. आज जगात जे चालले आहे, ते पाहता 'बळावर आधारित व्यवस्था' अधिक आकर्षक वाटू शकते. मोठा देश लहान देशाला दबावात ठेवतो, व्यापार शस्त्र बनतो, तंत्रज्ञान राजकारणाचा भाग ठरतो. पण असा मार्ग शेवटी अस्थिरतेकडेच नेतो. भारत आणि युरोप जर नियम, पारदर्शकता आणि संवाद यांवर आधारित भागीदारी उभारू शकले, तर ती केवळ दोघांसाठीच नाही, तर जागतिक व्यवस्थेसाठीही दिलासादायक ठरेल. भारत-युरोप नात्याचा खरा अर्थ हा कोणाच्या विरोधात उभे राहण्यात नाही, तर कोणाच्या दबावाखाली न झुकता स्वतःची भूमिका ठामपणे मांडण्यात आहे. आजच्या अनिश्चित जगात हीच भूमिका सर्वांत मोठी ताकद ठरू शकते. नियमांचा आधार घेतलेले नाते हे तात्पुरते फायद्याचे नसते, पण दीर्घकाळ टिकणारे आणि स्थैर्य देणारे असते आणि सध्या जगाला याच स्थैर्याची सर्वाधिक गरज आहे.

# लोकशाहीच्या उत्सवाला पर्यावरणपूरक संकल्पनांची जोड

## पहिल्यांदाच मतदानाचा हक्क बजावणार असल्याने नवोदित मतदारांमध्ये उत्साह

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** लोकशाहीचा उत्सव केवळ मतदानापुरता मर्यादित न राहता तो नागरिकांमध्ये सामाजिक, पर्यावरणीय आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा ठरावा, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने यंदा अभिनव उपक्रम राबवला आहे. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात पर्यावरणपूरक विचार, स्वच्छता, आरोग्य आणि शाश्वत विकासाचा संदेश देणारी ८ नाविन्यपूर्ण मतदान केंद्रे उभारण्यात आली असून लोकशाही मूल्यांचा आणि निसर्गसंवर्धनाचा सुंदर समन्वय साधण्यात आला आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केले.




पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ अंतर्गत १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी महापालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत प्रत्येकी एक अशी एकूण आठ नाविन्यपूर्ण मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. या मतदान केंद्रांची पाहणी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी केली असून मतदारांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या नाविन्यपूर्ण मतदान केंद्रांमध्ये 'सौर ऊर्जा', 'हरित मतदान केंद्र', 'ओला व सुका कचरा वर्गीकरण', 'तंदुरुस्त रहा (Stay Fit)', 'आरआरआर (Reduce, Recycle, Reuse)', 'पाणी वाचवा', 'स्वच्छ हवा कृती आराखडा (GRAP)' तसेच 'पंचतत्त्व' अशा विषयांचा समावेश करण्यात आला आहे. विषयानुसार सजावट, माहितीपर फलक व जनजागृती संदेशांच्या माध्यमातून मतदारांमध्ये पर्यावरणीय व सामाजिक जाणीव निर्माण करण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. आकुर्डी येथील न्यू पुणे पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे 'सौर ऊर्जा' विषयावर आधारित मतदान केंद्र उभारण्यात आले आहे. चिंचवड येथील आचार्य श्री आनंद ऋषीजी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये 'हरित मतदान केंद्र' साकारले आहे. मोशी येथील सावित्रीबाई फुले शाळेत 'ओला व सुका कचरा वर्गीकरण' संकल्पना राबविण्यात आली आहे. चिखलीतील प्राथमिक विद्यालय जाधववाडी येथे 'आरआरआर' संकल्पनेद्वारे शाश्वत विकासाचा संदेश देण्यात आला आहे.

**+ सौर ऊर्जा, हरित मतदान केंद्र, स्वच्छ हवा, जलसंवर्धन व पंचतत्त्वांचा संदेश देत मतदारांमध्ये सामाजिक-पर्यावरणीय जाणीव निर्माण**

पिंपळे सौदागर येथील जी. के. गुरुकुल स्कूलमध्ये 'तंदुरुस्त रहा' व 'पाणी वाचवा' या विषयांवर आधारित मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. थेरगाव येथील प्रिन्स सोसायटीमध्ये 'स्वच्छ हवा कृती आराखडा (ग्रॅप)' तसेच स्त्री शक्ती सबलीकरणाचा संदेश देणारे मतदान केंद्र उभारले आहे. कासारवाडी येथील मनपा विद्यालयात 'पंचतत्त्व' या संकल्पनेतून पृथ्वी, जल, अग्नी, वायू व आकाश यांचा समतोल जपण्याचा संदेश देण्यात आला आहे.

मतदानाचा हक्क बजावताना पर्यावरण व समाजाप्रती असलेली जबाबदारी प्रत्येक मतदाराच्या मनात रुजावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. दरम्यान, पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी १५ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या संख्येने मतदान करून लोकशाही अधिक बळकट करावी, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक : आज सकाळी १० वाजता मतमोजणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी आज शहरात शांततेत मतदान प्रक्रिया पार पडत आहे. या निवडणुकीची मतमोजणी उद्या शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता शहरातील निश्चित केलेल्या आठ ठिकाणी सुरू होणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली.

मतमोजणी केंद्रांवर केवळ निवडणूक विभागाकडून अधिकृत ओळखपत्र देण्यात आलेल्या पात्र व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे. मतमोजणीदरम्यान सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, पार्किंग व्यवस्था तसेच प्रसारमाध्यमांसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आले आहेत. निकाल जाहीर करताना अचूकता व पारदर्शकता राखण्यासाठी संगणकीय प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

प्रभाग क्रमांक १०, १४, १५ व १९ यांची मतमोजणी स्थानिक संस्था कर कार्यालय, हेडगेवार भवन, निगडी येथे होणार असून त्यासाठी

**+ शहरातील ८ ठिकाणी मतमोजणी केंद्र; पारदर्शक व संगणकीय पद्धतीने निकाल – आयुक्त श्रावण हर्डीकर**

१५ ते १८ फेऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २२ यांची मतमोजणी ऑटो क्लस्टर, चिंचवड येथील छोट्या सभागृहात पार पडणार आहे. भोसरीतील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल येथे प्रभाग क्रमांक ०२, ०६, ०८ व ०९ यांची, तर रहाटणी येथील ड क्षेत्रीय कार्यालयात प्रभाग क्रमांक २५, २६, २८ व २९ यांची मतमोजणी होणार आहे. भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह परिसरात प्रभाग क्रमांक ०३, ०४, ०५ व ०७ यांची व्यवस्था करण्यात आली आहे. चिखली टाउनहॉल येथे प्रभाग क्रमांक १, ११, १२ व १३, तर थेरगाव येथील कामगार भवनात प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ यांची मतमोजणी होईल. कासारवाडी भाजी मंडई येथे प्रभाग क्रमांक २०, ३०, ३१ व ३२ यांची मतमोजणी पार पडणार आहे. मतमोजणी शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने पार पडावी यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी स्पष्ट केले.

# निवडणूक काळात गैरहजर राहणे महागात

## पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील पाच पोलिसांचे निलंबन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** निवडणूक काळात कर्तव्यावर गैरहजर राहिल्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील पाच पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले असून, या निर्णयामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. पोलीस हवालदार संजय केळकर, सागर बाविस्कर तसेच पोलीस शिपाई

**+ कर्तव्यावर हजर न राहिल्याबद्दल पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांचा कठोर निर्णय**

जगन्नाथ शिंदे, प्रतिभा गावडे आणि संतोष जाधव अशी निलंबित करण्यात आलेल्या पोलिसांची नावे आहेत. हे सर्व पोलीस कर्मचारी सध्या पोलीस मुख्यालयात नेमणुकीस होते.

पिंपरी-चिंचवड महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक गुरुवारी (दि. १५ जानेवारी) होत असून, त्यापूर्वी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील तळेगाव, आळंदी आणि चाकण नगरपरिषदांच्या निवडणुका पार पडल्या आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात राजकीय हालचालींना वेग आला असून, विविध पक्षांचे महत्त्वाचे नेते, पदाधिकारी व उमेदवार शहरात दौरे करत आहेत. या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येतो.

# पुणे-मुंबईत मतदानादरम्यान गोंधळ; बोगस मतदानाचा आरोप, यादीतील घोळ उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे महापालिका निवडणुकीदरम्यान बोगस मतदानाचा गंभीर आरोप समोर आला असून, वानवडी परिसरातील सनग्रेस स्कूल मतदान केंद्रावर मूळच्या बिहारच्या असलेल्या चार महिलांनी बोगस मतदान केल्याचा दावा कार्यकर्त्यांनी केला आहे. चौघी मतदानासाठी केंद्रावर आल्या आणि त्यांनी नियमबाह्य पद्धतीने मतदान केल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. याशिवाय जनवाडी परिसरातील वीर बाजीप्रभू विद्यालय मतदान केंद्रावरही बोगस मतदान झाल्याची चर्चा रंगली आहे.

दरम्यान, मुंबई महापालिकेच्या निवडणुकीतही मतदार यादीतील गोंधळामुळे अनेक नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहिल्याचे प्रकार समोर आले आहेत. अंधेरी पूर्व येथील संभाजी नगर भागातील ७५ वर्षीय दिलीप पाटील यांचे नाव वॉर्ड क्रमांक ८४ च्या मतदार यादीतून गायब झाल्याने ते मतदान करू शकले नाहीत. यापूर्वी अनेक निवडणुकांत मतदान केले असतानाही यावेळी नाव नसल्याने मोठा गोंधळ निर्माण झाला.



शहरातील अनेक मतदान केंद्रांवर नाव व फोटो यांची गल्लत, ऑनलाइन अपडेट झालेले फोटो प्रत्यक्ष यादीत न दिसणे, नवीन व्होटर आयडी असूनही नाव न सापडणे, तसेच एका ठिकाणी मुलाचे नाव आणि आईचा फोटो असल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. या तांत्रिक व प्रशासकीय त्रुटींमुळे मतदारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत दुबार मतदान रोखणे हे मोठे आव्हान ठरत आहे. सुरुवातीला ११ लाखांहून अधिक दुबार मतदारांची नोंद होती. तपासणीनंतर अंतिमतः १

**+ वानवडीत चार बिहारी महिलांवर बोगस मतदानाचा आरोप; मुंबईत दुबार मतदार व नाव गायब होण्याचे प्रकार**

लाख ६८ हजार ३५० दुबार मतदारांची नावे कायम ठेवण्यात आली असून, त्यापैकी सुमारे एक लाख मतदारांनी अद्याप दुबार मतदान न करण्याचे हमीपत्र दिलेले नाही. मतदान प्रक्रियेची विश्वासार्हता टिकवण्यासाठी प्रशासनाने बोगस मतदानाच्या आरोपांची तातडीने चौकशी करावी, तसेच मतदार यादीतील त्रुटी दूर कराव्यात, अशी मागणी नागरिक व कार्यकर्त्यांकडून केली जात आहे.

# मतदान केंद्रांवर सीसीटीव्हीची करडी नजर

## पिंपरी-चिंचवड महापालिकेने उभारली अत्याधुनिक वेब कास्टिंग सुविधा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. ही मतदान प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक आणि कायदा-सुव्यवस्थेला बाधा न येता पार पडावी, यासाठी महापालिकेने सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे वेब कास्टिंगची सुविधा उभारली आहे.

महापालिकेने शहरातील एकूण २ हजार ६७ मतदान केंद्र निश्चित केली असून, या सर्व केंद्रांवर मिळून तब्बल ४ हजार ५२८ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून प्रत्येक मतदान केंद्रावर सातत्याने नजर



ठेवली जाणार आहे. यासाठी पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत स्वतंत्र वॉर रूम उभारण्यात आली असून तेथून संपूर्ण मतदान प्रक्रियेचे थेट निरीक्षण केले जाणार आहे.

या वेब कास्टिंग सुविधेंतर्गत प्रत्येक मतदान केंद्राच्या आत एक, मतदान केंद्राच्या बाहेर एक तसेच मतदान केंद्र असलेल्या इमारतीच्या प्रवेशद्वारावर एक असे कॅमेरे बसवण्यात आले आहेत. त्यामुळे

> "पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदान प्रक्रिया शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पडावी, यासाठी सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे वेब कास्टिंग सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या माध्यमातून सातत्याने देखरेख ठेवली जाणार असून कायदा व सुव्यवस्थेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे."
>
> —**श्रावण हर्डीकर,** आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका

मतदानाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रभावी नियंत्रण ठेवता येणार आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नोडल अधिकारी तथा सह शहर अभियंता अनिल भालसाखळे यांच्या अधिपत्याखाली ही संपूर्ण वेब कास्टिंग व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे. वॉर रूममध्ये सहाय्यक नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंते महेश कावळे, बाळू लांडे, संतोष दुर्गे यांच्यासह दोन उपअभियंते, आठ कनिष्ठ अभियंते तसेच इतर कर्मचारी कार्यरत राहणार आहेत.

महापालिकेने उभारलेल्या या अत्याधुनिक व्यवस्थेमुळे निवडणूक प्रक्रियेवर सतत देखरेख ठेवली जाणार असून, नागरिकांना निर्भय आणि सुरक्षित वातावरणात मतदान करता येणार आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये भीषण अपघात; दोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** मकर संक्रांतीसारख्या सणाच्या दिवशी पिंपरी-चिंचवड शहरातील काळेवाडी परिसरात झालेल्या भीषण अपघातात दोन सख्ख्या बहिणींचा दुर्दैवी मृत्यू झाला. काळेवाडी येथील धनगर बाबा मंदिरासमोरील पेट्रोल पंपाजवळ भरधाव आयशर ट्रकने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत हा अपघात घडला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. शिंदे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

ऋतुजा पांडुरंग शिंदे आणि नेहा पांडुरंग शिंदे (वय २०) अशी मृत्यू झालेल्या बहिणींची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ऋतुजा आणि नेहा या दोघी दुचाकीवरून प्रवास करत असताना काळेवाडी परिसरात भरधाव वेगात आलेल्या आयशर ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघीही गंभीर जखमी

**+ मकर संक्रांतीच्या दिवशी काळेवाडी परिसरात दुचाकीला आयशर ट्रकची धडक, शिंदे कुटुंबावर दु:खाचा डोंगर**

झाल्या. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदत करत त्यांना रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी दोघींना मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघातास कारणीभूत ठरलेल्या आयशर ट्रक चालक जितेंद्र निराले याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

महिलांसाठी महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या मकर संक्रांतीच्या दिवशी दोन तरुण बहिणींचा मृत्यू झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### वडगाव सहानीत बिबट्या मृतावस्थेत आढळला



**वडगाव सहानी :** येथील शिंदे मळ्यात सात ते आठ वर्षांचा बिबट्या मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील गणेश जेडगुळे यांनी वन विभागाला कळवले. वन अधिकारी महेश बगाड यांनी घटनास्थळी पाहणी करून दोन बिबट्यांतील हाणामारीत मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला. मात्र परिसरात अजून बिबट्या असल्याची भीती व्यक्त होत असून तातडीने पिंजरा लावण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

### धोकादायक विहीर अपघाताला निमंत्रण

**लोणी-मंचर :** (ता. आंबेगाव) रस्त्यावरील जारकरवाडी येथील भोजनदऱ्यात रस्त्याच्या कडेला असलेली विहीर वाहनचालकांसाठी गंभीर धोका ठरत आहे. अलीकडे विहिरीजवळील झाडे-झुडपे काढल्याने ही विहीर पूर्णतः उघडी पडली आहे. मंचरला जाण्यासाठी हा एकमेव वर्दळीचा मार्ग असल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने संरक्षक कठडे किंवा भिंत बांधावी, अशी मागणी राजेंद्र सिनलकर, अक्षय विधाटे व वाहनचालकांनी केली आहे.

### रांजणी ग्रामपंचायतीला इलेक्ट्रिक घंटागाडी भेट

**पारगाव :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने आंबेगाव तालुक्यातील रांजणी ग्रामपंचायतीला ओला व सुका कचरा संकलनासाठी इलेक्ट्रिक घंटागाडी प्रदान करण्यात आली. रांजणी गावाची लोकसंख्या मोठी असल्याने स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी ही घंटागाडी देण्यात आली आहे.

---

**राष्ट्रवादी विरुद्ध संभाव्य सर्वपक्षीय आघाडी; भाजप स्वबळावर मैदानात, उमेदवारीवरून रस्सीखेच तीव्र**

# आंबेगावात जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीत तिरंगी लढतीचे संकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत यंदा राजकीय समीकरणे पूर्णपणे बदललेली दिसत असून राष्ट्रवादी काँग्रेससमोर प्रथमच मोठे आव्हान उभे राहण्याची चिन्हे आहेत. राष्ट्रवादी विरुद्ध संभाव्य सर्वपक्षीय आघाडी आणि भाजप स्वबळावर अशी तिरंगी लढत होण्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळे निवडणूक चुरशीची व हाय व्होल्टेज ठरण्याची शक्यता आहे.

आंबेगाव तालुक्यात जिल्हा परिषदेच्या एकूण ५ तर पंचायत समितीच्या १० जागा आहेत. मागील अनेक निवडणुकांमध्ये पंचायत समितीवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता राहिली आहे. मागील जिल्हा परिषद निवडणुकीत राष्ट्रवादीने ४ जागांवर विजय मिळवला होता, तर शिवसेनेला एका जागेवर समाधान मानावे लागले होते. पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादीला ६, शिवसेनेला ३ जागा मिळाल्या होत्या, तर एक अपक्ष उमेदवार निवडून आला होता. मात्र, त्यानंतरच्या कालावधीत राजकारणात मोठे बदल घडून आले आहेत.

एकेकाळी माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे कट्टर विरोधक असलेले माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील सध्या त्यांच्या सोबत असल्याने राष्ट्रवादीची बाजू भक्कम मानली जात आहे. मात्र, वळसे पाटील यांचे माजी सहकारी आणि पंचायत समितीचे माजी सभापती देवदत्त निकम विरोधात ठाकल्याने अंतर्गत आव्हानही वाढले आहे. दीर्घ कालावधीनंतर होत असलेल्या या निवडणुकीमुळे इच्छुकांची संख्या मोठी असून अनेक गटांमध्ये उमेदवारीसाठी मोठी रस्सीखेच पाहायला मिळत आहे.

मंचर नगरपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी-भाजप युतीचा फटका राष्ट्रवादीला बसल्याचा अनुभव लक्षात घेता यावेळी राष्ट्रवादीने भाजपला सोबत न घेता स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जाते. दुसरीकडे राष्ट्रवादीविरोधात शिंदेसेना, उद्धवसेना आणि शरद पवार गट यांची सर्वपक्षीय आघाडी होण्याचे संकेत मिळत आहेत. यासाठी संबंधित पक्षांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये बैठका झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. मात्र, अद्याप कोणत्याही पक्षाने अधिकृत घोषणा केलेली नाही. तसेच या आघाडीला पक्षाच्या शीर्ष नेतृत्वाची मान्यता मिळणेही आवश्यक आहे.

आघाडी झाल्यास जागावाटपाचे प्राथमिक सूत्रही चर्चेत आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या ५ जागांपैकी ३ जागा शिंदेसेनेला तर २ जागा शरद पवार गटाला दिल्या जाण्याची शक्यता आहे. पंचायत समितीच्या १० जागांपैकी ४ जागा उद्धवसेनेला, ४ जागा शरद पवार गटाला आणि २ जागा शिंदेसेनेला देण्याबाबत चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे बोलले जाते. विशेष म्हणजे या आघाडीत एका पक्षाचा उमेदवार दुसऱ्या पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.

पेठ घोडेगाव आणि कळंब-रांजणी या दोन जिल्हा परिषद गटांमध्ये राष्ट्रवादीचे उमेदवार जवळपास निश्चित झाले असून त्यांनी प्रचारालाही सुरुवात केली आहे. मात्र, या गटांमध्ये विरोधकही सक्रिय झाले आहेत. कळंब-रांजणी गट शरद पवार गटाला गेल्यास शिंदेसेनेच्या प्रीती थोरात यांना त्या गटातून उमेदवारी मिळून त्या शरद पवार गटाच्या चिन्हावर लढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशीच परिस्थिती अवसरी-पिंपळगाव घाट गटातही दिसू शकते.

निरगुडसर-पारगाव जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादीकडून माजी उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात असून त्यांनी प्रचार सुरू केला आहे. मात्र, राष्ट्रवादीतील इच्छुक अरुण गिरे यांनी बंडखोरीचे संकेत दिल्याने या गटात समीकरणे बदलू शकतात. शिंदेसेनेकडून निरगुडसरचे सरपंच रवींद्र वळसे पाटील यांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. त्यामुळे या गटात हाय व्होल्टेज लढत होण्याची चिन्हे आहेत.

दरम्यान, भाजपने ही निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला असून सर्व १५ जागांवर उमेदवार देण्याची तयारी केली आहे. येत्या दोन दिवसांत भाजपकडून उमेदवारांची घोषणा होण्याची शक्यता आहे. एकूणच आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक यंदा तिरंगी लढतीत अडकण्याची शक्यता असून उद्यापासून राजकीय रणधुमाळीला वेग येणार आहे.

---

# वसांगनोरे येथे महिला बचत गटांसाठी व्यावसायिक कार्यशाळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाईल्डफंड इंडिया व स्किल इंडिया हबचा संयुक्त उपक्रम; १०५ महिलांचा सहभाग**

**सांगनोरे :** (ता. जुन्नर) येथे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत चाईल्डफंड इंडिया आणि स्किल इंडिया हब यांच्या संयुक्त विद्यमाने, रॅम्प योजनेअंतर्गत एकदिवसीय मोफत महिला व्यावसायिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम गौरी शंकर सामाजिक प्रतिष्ठान, जुन्नर यांच्या माध्यमातून राबविण्यात आला.

या कार्यशाळेत कोल्हेवाडी, वाघेचीवाडी, इरनकवाडी, लोहोकरवाडी आणि गवारवाडी या परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकूण १०५ महिला तसेच १५ महिला बचत गटांच्या अध्यक्षा, सचिव व सदस्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला भरघोस प्रतिसाद दिला.

कार्यशाळेचे प्रभावी प्रशिक्षण मिनाथ जाधव यांनी दिले. महिलांना कौशल्य विकास, स्वयंरोजगाराच्या संधी, आर्थिक सक्षमीकरण, तसेच उद्यमशीलता विकास या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महिलांना 'उद्यम आधार' साहित्याचे वितरणही करण्यात आले, ज्यामुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक प्राथमिक साधनसामग्री आणि प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद उमेद पंचायत समिती, जुन्नर येथील श्रीमती उषा अभंग यांनी भूषवले. त्यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी उमेद पंचायत समितीचे सागर टिकेकर, सांगनोरे ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश मराडे, ग्रामसेवक चिंतामण केंगळे, कर्मचारी विलास नायकोडी व लक्ष्मण गवारी उपस्थित होते. तसेच स्किल इंडिया हबचे अक्षय कुटे व मयूर मेहेर, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे प्रमुख संतोष सावंत यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन मंगेश आतकर आणि विश्वास गालफाडे यांनी केले. या उपक्रमासाठी अजित सौर (फील्ड कोऑर्डिनेटर) आणि अभिजीत मदने (प्रकल्प अधिकारी) यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी व आत्मनिर्भरतेसाठी अशा प्रकारचे उपक्रम अत्यंत आवश्यक आहे.

---

## बदलत्या हवामानातही फ्लॉवरचे पीक जोमात..!



लाखणगाव (ता. आंबेगाव) परिसरात बदलत्या हवामानातही जोमात आलेले फ्लॉवरचे पीक; समाधानकारक बाजारभावामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान. (छायाचित्र : अरुण गोरडे)

---

# डिसेंट फाउंडेशनच्या नेत्र शिबिरांना ग्रामीण भागातून वाढता प्रतिसाद

**मढ येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जुन्नर :** ग्रामीण भागातील गरजू नागरिकांसाठी आशेचा किरण ठरत असलेल्या डिसेंट फाउंडेशनच्या नेत्र शिबिरांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, आज गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मढ (ता. जुन्नर, जि. पुणे) येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या सभागृहात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिरात एकूण ४२ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल येथे पाठविण्यात आले आहे. या सर्व रुग्णांना तपासणीपासून ते मोतीबिंदू शस्त्रक्रिया, प्रवास, निवास, जेवण, चष्मा तसेच एक महिन्याची औषधे अशा सर्व सुविधा पूर्णतः मोफत देण्यात येणार आहेत. डिसेंट फाउंडेशन, पुणे यांच्या पुढाकाराने आणि शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या सहकार्याने मागील दोन वर्षांत जुन्नर तालुक्यासह विविध भागांत पाच हजारांहून अधिक नेत्र रुग्णांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या आहेत. त्यामुळे अनेक गरजू रुग्णांना नव्याने दृष्टी मिळाली असून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्टपणे दिसून येत आहे. संपूर्ण जुन्नर तालुका 'मोतीबिंदू मुक्त' करण्याचा संकल्प डिसेंट फाउंडेशनने केला आहे. या उपक्रमासाठी सामाजिक संस्था, ज्येष्ठ नागरिक संघ तसेच स्थानिक कार्यकर्ते सक्रिय सहकार्य करत आहेत. अधिकाधिक गरजू रुग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी यावेळी केले. या शिबिरास जितेंद्र बिडवई, सदस्य गणेश मेहेर, शंकरा आय हॉस्पिटलच्या शिबिर समन्वयक ज्योती पाटील व त्यांची टीम, मढ येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मस्करे, सचिव मुरलीधर मोढवे, तसेच दगडू मस्करे, निवृत्ती सदाकाळ, केशव घायवट, दत्तात्रय पानसरे, राजश्री कदम, आशा सेविका निलीमा मोढवे, संजीवनी बुट्टे आदी मान्यवर उपस्थित होते. नेत्र रुग्ण व ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला.

---

## कंबर व मणक्यांच्या दुखण्याच्या उपचारात ANSSI Wellness नवी आशा - दिनेश दळवी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**औषध, इंजेक्शन वा शस्त्रक्रियेशिवाय मणक्यांच्या आजारांवर उपचार - ANSSI Wellness ठरते प्रभावी पर्याय**

**पुणे :** बदलत्या जीवनशैलीमुळे मानदुखी, कंबरदुखी, सायटिका, स्लिप डिस्क, स्पॉन्डिलायसिस व स्पॉन्डिलोसिससारख्या मणक्यांच्या आजारांनी त्रस्त रुग्णांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर औषध, इंजेक्शन, भूल किंवा शस्त्रक्रिया न करता मणक्यांच्या आजारांवर उपचार करणारे ए एन एस एस आय वेलनेस (ANSSI Wellness) हे रुग्णांसाठी प्रभावी पर्याय ठरत असल्याचे प्रतिपादन संस्थापक दिनेश दळवी यांनी औंध येथील नव्या सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी केले.

दळवी म्हणाले, काही वर्षांपूर्वी स्वतः मणक्यांच्या आजाराने त्रस्त असताना भारतात उपचार करूनही आराम न मिळाल्याने अमेरिकेत सुप्रसिद्ध स्पाईन तज्ज्ञ डॉ. जोसेफ कॅमराटा यांच्याकडून नॉन-सर्जिकल स्पायनल डी-कंप्रेशन उपचार घेतले. पूर्ण बरे झाल्यानंतर ही शस्त्रक्रियाविरहित उपचार पद्धत भारतात आणण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच औंध येथे ANSSI Wellness सेंटर सुरू करण्यात आले.

माजी आयएएस अधिकारी केशव कांबळे यांनी ही उपचारपद्धत खर्चिक शस्त्रक्रियेच्या तुलनेत परवडणारी व कमी त्रासदायक असल्याचे सांगितले. ही अमेरिकन पेटंट असलेली पद्धत डिस्कवरील मज्जासंस्थेचा ताण कमी करून नैसर्गिक उपचार करते. हार्वर्ड, मेयो क्लिनिकसारख्या संस्थांशी संबंधित तज्ज्ञांनी विकसित केलेली ही प्रणाली विकसित देशांत ४० वर्षांपासून वापरात आहे.

देशभरात आतापर्यंत ८,००० हून अधिक रुग्णांच्या शस्त्रक्रिया टाळण्यात यश आले असून, पुण्यात चार वर्षांत २,५०० पेक्षा जास्त रुग्णांना लाभ झाला आहे. ३,००० चौरस फूट क्षेत्रफळातील या सेंटरमध्ये ५० हून अधिक तज्ज्ञ कार्यरत आहेत.

---

# ओझर येथे शरदचंद्र पवार फार्मसी महाविद्यालयाचे एन.एस.एस. श्रमसंस्कार शिबिर उत्साहात

**स्वच्छता, आरोग्य, जनजागृती उपक्रमांतून 'नॉट मी, बट यू'चा संदेश**

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी, ओझर येथील राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विशेष श्रमसंस्कार शिबिर अष्टविनायकांपैकी एक असलेल्या व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या ओझर गावात दिनांक ७ ते १३ जानेवारी या कालावधीत उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडले.

'नॉट मी, बट यू' या ब्रीदवाक्याचा प्रत्यय देत स्वयंसेवकांनी सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवले, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश दामा यांनी दिली.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष विशाल तांबे, मानद सचिव वैभव तांबे, नीलमताई तांबे यांनी स्वयंसेवक व ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. संजय देवकर, देवस्थानचे अध्यक्ष बाळकृष्ण कवडे, सरपंच राजश्री कवडे, उपसरपंच विठ्ठल जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. गटविकास अधिकारी प्रतीक चन्नावर व सहाय्यक गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर यांनी महिला बचत गटांना शासकीय योजनांची माहिती दिली, अशी माहिती एन.एस.एस. अधिकारी डॉ. अस्मिता गायकवाड यांनी दिली. शिबिराच्या कालावधीत ग्रामस्वच्छता, नदीकाठ स्वच्छता, प्लास्टिकमुक्त ओझर अभियान, देवस्थान परिसरात कागदी पिशव्यांचे वाटप व प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती असे उपक्रम राबवण्यात आले. जनआरोग्य उपक्रमांतर्गत नारायणगाव येथील खैरे हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहकार्याने दंत तपासणी, महिलांचे व विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर घेण्यात आले. तसेच औषध वापर, मुदत संपलेली औषधे व त्यांची योग्य विल्हेवाट याबाबत घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात आले. जनजागृती कार्यक्रमांत व्यसनमुक्ती, बालविवाह प्रतिबंध, महिला सुरक्षा, रस्ता सुरक्षा विषयक रॅली, पथनाट्य व भाषणे आयोजित करण्यात आली. शिबिराचा समारोप १३ जानेवारी रोजी पार पडला. यावेळी एम.बी.ए. कॉलेजचे प्राचार्य डॉ. रमेश काकड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. "हा उपक्रम येथे संपला असला तरी आरोग्य व सामाजिक जबाबदारीची जाणीव आयुष्यभर टिकली पाहिजे," असे मत प्राचार्य डॉ. गणेश दामा यांनी व्यक्त केले.

---

## नगदवाडी शाळेत लायन्स क्लब शिवनेरीकडून ४५ विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** नगदवाडी (ता. जुन्नर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एक प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. कुमारी राही नरेंद्र गोसावी हिच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीमधील गरीब व गरजू ४५ विद्यार्थ्यांना थंडीपासून संरक्षण मिळावे यासाठी स्वेटरचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेतील एकूण १८२ विद्यार्थ्यांना शालोपयोगी शैक्षणिक साहित्य व खाऊचे वितरण करण्यात आले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी शाळेच्या आवारात वृक्षारोपणही करण्यात आले. या उपक्रमासाठी लायन्स क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या सर्व सदस्यांनी आर्थिक योगदान दिले. विशेष म्हणजे केक कापण्याऐवजी पपई हे फळ कापून आगळावेगळ्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यात आला.कार्यक्रमास दिपक वारुळे, सचिव सह्याद्री भिसे, प्रथम उपाध्यक्ष सचिन जंगम, अजय चोरडिया, अशोक खांडगे, नरेंद्र गोसावी, भाग्यश्री गोसावी तसेच मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे, दिनेश बढे यांच्यासह शिक्षकवर्ग उपस्थित होता.

---

**माऊली मंदिरात हरिनाम गजरात लाखावर भाविकांची गर्दी; इंद्रायणी घाटावर महिलांचा हळदी-कुंकू, महाआरतीने भक्तिमय वातावरण**

# आळंदीत मकर संक्रांत व षटतिला एकादशी उत्साहात साजरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** मकर संक्रांत आणि षटतिला एकादशीचा पावन योग साधत आळंदी येथे भक्ती, परंपरा आणि उत्सवाचा संगम पाहायला मिळाला. येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी अर्थात माऊली मंदिरात राज्याच्या विविध भागांतून आलेल्या लाखावर भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. हरिनाम गजर, वेदमंत्रांचा जयघोष आणि भक्तिभावाने संपूर्ण आळंदी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली होती.

मकर संक्रांत आणि एकादशी एकत्र आल्याने महिलांची संख्या विशेष लक्षणीय ठरली. माऊली मंदिर दर्शनबारी, इंद्रायणी नदी घाट, तसेच नदीवरील स्काय वॉक पुलावर महिला भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. महिलांनी पारंपरिक वेशात माऊलीचे दर्शन घेत एकमेकींना ओवसा देत, वाण वाटत मकर संक्रांतीच्या प्रथा-परंपरा उत्साहात पाळल्या.

या निमित्ताने आळंदी देवस्थानच्या वतीने इंद्रायणी नदी घाटावर महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देवस्थानच्या महिला विश्वस्त रोहिणी पवार यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला. इंद्रायणी आरती



सेवा समिती, आवेकर भावे रामचंद्र संस्थान यांच्या सहकार्याने मंदिर परिसरात आणि नदी घाटावर सुमारे २०० हून अधिक महिला भाविकांना वाण वाटप करण्यात आले. सायंकाळी इंद्रायणी महाआरती वेदमंत्र, जयघोषात संपन्न झाली.

इंद्रायणी आरतीप्रसंगी सेवा भावी संस्था, पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी नदी प्रदूषण रोखणे, नदी व परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. 'नदी स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन'चा एल्गार यावेळी जाहीर करण्यात आला. माऊली मंदिरात षटतिला एकादशीनिमित्त श्रींना तिळाचा अभिषेक, महानैवेद्य अर्पण करण्यात आला. मंदिरात आकर्षक पुष्पसजावट करण्यात आली होती. भाविकांची गर्दी लक्षात घेता देवस्थान प्रशासनाने विशेष दर्शन व्यवस्था केली होती. महिलांसाठी पंखा मंडपातून, तर पुरुष भाविकांसाठी मंडपाबाहेरून दर्शनाची सोय करण्यात आली होती. यापूर्वी झालेल्या नाराजीचा विचार करून यावेळी दर्शन व्यवस्थेत सुधारणा करण्यात आल्याचे भाविकांनी सांगितले.

माऊली मंदिरासह आळंदीतील श्री विष्णू मंदिर, श्री राम मंदिर, श्री स्वामी महाराज मंदिर, श्री हजेरी मारुती मंदिर, श्री भैरवनाथ मंदिर येथेही भाविकांची मोठी गर्दी झाली होती. इंद्रायणी नदी घाट, प्रदक्षिणा मार्ग आणि स्काय वॉक पुलावर दर्शनासाठी भाविकांची रेलचेल होती. मात्र, काही अरुंद रस्ते व परिक्रमा मार्गामुळे काही काळ वाहतूक अडचणी निर्माण झाल्या.

भाविकांच्या सुरक्षेसाठी आणि शांतता सुव्यवस्थेसाठी आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, पोलीस नाईक मच्छिंद्र नाईक यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## सारांश वृत्त

### दिल्लीत ६ कोटींहून अधिक टेलिफोन

**नवी दिल्ली :** दिल्लीत २०२५ मध्ये सहा कोटींहून अधिक टेलिफोन कनेक्शनची नोंद झाली आहे, ज्यामध्ये राजधानीतील प्रत्येक रहिवासी सरासरी किमान दोन वायरलेस कनेक्शन वापरत आहे. दिल्ली सरकारच्या अर्थशास्त्र आणि सांख्यिकी विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये वायरलेस टेलिफोन कनेक्शनची संख्या सुमारे ५.६१ कोटी होती, तर वायरलाइन सेवांची संख्या ४७.१ लाख होती. गेल्या आठ वर्षांत टेलिफोन कनेक्शनची एकूण संख्या स्थिर राहिली आहे.

### फटाके फुटल्याने पार्सल लॉरीला आग

**त्रिशूर (केरळ) :** येथील नदाथरा जवळील सर्व्हिस रोडवर गुरुवारी पार्सल वाहून नेणाऱ्या एका लॉरीला आग लागली कारण त्यात काही पार्सलमध्ये फटाके वाजले होते, असे पोलिसांनी सांगितले. सकाळी ९ वाजताच्या सुमारास लॉरीतील पॅकेजेस दुसऱ्या वाहनात उतरवत असताना ही घटना घडली, असे पोलिसांनी सांगितले. काम करणाऱ्या एका कामगाराच्या हाताला आग लागली. ओल्लूर पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, लॉरीच्या जमिनीवरून पॅकेजेस ओढत असताना, उतरवण्याच्या प्रक्रियेदरम्यान, एक ठिणगी निर्माण झाली ज्यामुळे फटाक्यांना आग लागली.

### झारखंडमधील पलामू येथे दोघांवर गोळीबार



**मेदिनीनगर :** झारखंडच्या पलामू जिल्ह्यात गुरुवारी जुन्या वैमनस्यातून दोन जणांवर गोळ्या झाडण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही घटना शहर पोलीस स्टेशन परिसरातील कांदू मोहल्ला येथे घडली, असे त्यांनी सांगितले. जखमींची ओळख अजित कुमार गुप्ता (५२) आणि नवीन प्रसाद (४५) अशी आहे, असे त्यांनी सांगितले

## धर्मशाहीसमोरील सर्वात मोठे आव्हान?

# इराणमध्ये देशव्यापी संतापाचा उद्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**दुबई :** इराणमध्ये गेल्या काही दिवसांत उसळलेल्या देशव्यापी निदर्शनांनी हिंसक वळण घेतले असून, सुरक्षा दलांच्या दडपशाही कारवाईत मोठ्या प्रमाणावर रक्तपात झाला आहे. या चकमकींमधील मृतांची संख्या गेल्या दशकांतील सर्व निदर्शनांपेक्षा अधिक असल्याचे चित्र हळूहळू स्पष्ट होत आहे. १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर इराणच्या धर्मशाहीसमोर उभे राहिलेले हे कदाचित सर्वांत गंभीर आव्हान मानले जात आहे.

१९७८-७९ च्या क्रांतीच्या काळात जशी स्थिती निर्माण झाली होती, तशीच आठवण करून देणारी ही आंदोलने असल्याचे अनेक निरीक्षकांचे मत आहे. त्या वेळी अमेरिकेच्या पाठबळावर सत्तेत असलेले शाह मोहम्मद रझा पहलवी आणि निदर्शकांमध्ये रस्त्यांवर संघर्ष पेटले होते. मृतांच्या शोकसभांमधून आंदोलनांचा व्याप वाढत गेला आणि लाखो नागरिक रस्त्यावर उतरले. शाहला देश सोडावा लागला.

त्या काळानंतर फ्रान्समधून निर्वासित अवस्थेत परतलेल्या अयातुल्लाह रुहोल्लाह खोमेनी यांनी 'वेलायत-ए-फकीह' या संकल्पनेखाली संपूर्ण सत्ताकेंद्र आपल्या हातात घेतले. त्यानंतर हजारो माजी सरकारी अधिकारी, लष्करी अधिकारी, लेखक आणि कार्यकर्त्यांना फाशी देण्यात आली. महिलांसाठी सक्तीचा हिजाब लागू करण्यात आला आणि अमेरिकेशी दशकानुदशके तणावपूर्ण संबंध निर्माण झाले. १९७९ मधील अमेरिकन दूतावास ताब्यात घेण्याच्या घटनेने हा तणाव अधिकच वाढला. आजच्या परिस्थितीतही धर्मशाही भूतकाळातील त्या अराजक दिवसांकडेच वारंवार निर्देश करत आहे. सरकारी दूरचित्रवाणीवर १९८० च्या दशकातील हिंसाचाराचे जुने चित्रीकरण दाखवले जात आहे. सध्याच्या निदर्शनांत अटक झालेल्यांना 'मोहरेब' म्हणजेच 'देवाचे शत्रू' असे संबोधले जात असून, या आरोपाखाली मृत्युदंडाची तरतूद आहे. १९८८ मध्ये अशाच आरोपांखाली हजारो लोकांना फाशी देण्यात आली होती.

या आंदोलनांची सुरुवात आर्थिक असंतोषातून झाली. इराणी रियालची घसरण, महागाई आणि बेरोजगारीने त्रस्त सामान्य जनता आहे. सुरुवातीला सुधारक विचारांचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी संवादाची भूमिका घेत काही सवलती जाहीर केल्या. मात्र निदर्शनांचा व्याप वाढताच सरकारने इंटरनेट सेवा बंद केल्या, आंतरराष्ट्रीय संपर्क तोडले आणि सुरक्षा दलांनी थेट गोळीबारासह कारवाई केली.

कार्यकर्त्यांच्या मते, निदर्शकांकडून जबरदस्तीने कबुलीजबाब घेतले जात असून, त्यांचे दूरचित्रवाणीवर प्रसारण केले जात आहे. पत्रकारांवरील निर्बंध आणि माहितीवरील नियंत्रणामुळे प्रत्यक्ष मृत्यू व अटकांची संख्या स्वतंत्रपणे पडताळणे अवघड ठरत आहे. इराणी सरकार मात्र आंदोलकांवर परकीय शक्तींच्या हस्तक्षेपाचा आरोप करत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी कठोर भूमिका घेतल्याने आणि पाश्चिमात्य देशांनी निषेध व्यक्त केल्याने तणाव वाढला आहे. इतिहासाची चक्रे पुन्हा फिरत असल्याचा भास होत असताना, ही आंदोलने इराणला कोणत्या वळणावर नेतील, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

## जन नायगनला दिलासा नाही




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** विजय अभिनीत 'जन नायगन' चित्रपटाच्या प्रमाणपत्रावर मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या स्थगितीच्या आदेशाविरुद्ध केव्हीएन प्रॉडक्शन्सने दाखल केलेल्या याचिकेवर गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी न करण्याचा निर्णय घेतला.

न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्ट केले की, निर्मात्याने केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाच्या (सीबीएफसी) अध्यक्षांच्या ६ जानेवारीच्या आदेशाविरुद्ध चित्रपट पुनरावलोकन समितीकडे पाठवण्याचा पर्याय वापरला नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने याचिकेला प्रत्यक्ष सुनावणी न करता, निर्मात्यांना मद्रास उच्च न्यायालयाकडे प्रकरण परत पाठवण्याचे निर्देश दिले. सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती दत्ता यांनी एकल खंडपीठाच्या आदेशातील विलंबावर भाष्य करत सांगितले की सर्व खटले दाखल झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर निकाली काढले जाणे आवश्यक आहे. त्यांनी म्हटले, "खटले एक-दोन दिवसांत निकाली काढण्याचे स्वागत आहे, परंतु हे नियम सर्व खटल्यांवर समान पद्धतीने लागू होणे आवश्यक आहे." न्यायालयाने मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाला २० जानेवारीला पुढील सुनावणी करून निर्णय देण्याचे सूचित केले आहे.

## ईडीविरोधातील एफआयआरला स्थगिती

### ममता बॅनर्जी यांच्या सरकारला दणका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** कोलकात्यातील राजकीय सल्लागार कंपनी आय-पीएसीच्या कार्यालयावर टाकलेल्या छाप्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालय आणि पश्चिम बंगाल सरकार यांच्यातील संघर्ष आता थेट सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात ईडी अधिकाऱ्यांविरोधात दाखल करण्यात आलेल्या एफआयआरला स्थगिती देत ममता बॅनर्जी सरकार आणि कोलकाता पोलिसांना मोठा धक्का दिला आहे.

न्यायमूर्ती प्रशांत मिश्रा आणि विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने आय-पीएसी आणि कंपनीचे संचालक प्रतीक जैन यांच्या कार्यालयावरील छाप्याशी संबंधित एफआयआरवर तात्पुरती बंदी घातली. बंगालचे डीजीपी राजीव कुमार आणि कोलकाता पोलिस आयुक्त मनोज कुमार वर्मा यांच्या निलंबनाची मागणी करणाऱ्या ईडीच्या याचिकेवर केंद्र सरकारच्या गृह मंत्रालय, कार्मिक व प्रशिक्षण विभाग, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तसेच तृणमूल काँग्रेस सरकारकडून उत्तर मागवले आहे.

या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवरही न्यायालयाने संबंधित पक्षांना उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. यासोबतच, आय-पीएसी कार्यालयावर झालेल्या कारवाईदरम्यानचे सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल पोलिसांना दिले आहेत. ईडीने या प्रकरणात नवी याचिका दाखल करून बंगालचे डीजीपी राजीव कुमार यांच्यासह तीन वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी केली. मुख्यमंत्री ममता यांच्या संगनमताने या अधिकाऱ्यांनी तपासात अडथळे निर्माण केल्याचा आरोप ईडीने केला आहे.

## इराणचे हवाई क्षेत्र पुन्हा उघडल्याने दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** इराणमध्ये सुरू असलेल्या अशांततेमुळे गुरुवारी पाच तास बंद राहिल्यानंतर इराणी हवाई क्षेत्र पुन्हा उघडण्यात आले. अचानक बंद करण्याचे कारण स्पष्ट करण्यात आलेले नाही, मात्र अमेरिकेच्या संभाव्य लष्करी कारवाईच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून हा उपाय घेतला गेला, असे स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले. बंदी दरम्यान जगभरातील व्यावसायिक उड्डाणे मार्गदर्शित बदलांसह चालवली गेली.

भारतीय विमान कंपन्यांनाही याचा परिणाम झाला. इंडिगोने काही आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर परिणाम झाल्याचे जाहीर केले, तर एअर इंडियाने पर्यायी मार्गांद्वारे उड्डाणे सुरू असल्याचे सांगितले. यामुळे विलंब, रद्द किंवा मार्ग बदल होऊ शकतो. हे हवाई क्षेत्र युरोप व आशियाला जोडणाऱ्या प्रमुख पूर्व-पश्चिम मार्गावर असल्यामुळे आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. जर इराणने पुन्हा हवाई क्षेत्र बंद केले तर उड्डाण वेळ आणि इंधन खर्चात लक्षणीय वाढ होऊ शकते.

मध्यम पूर्वेतील तणाव लक्षात घेऊन जर्मनीने बुधवारी इराणी हवाई क्षेत्र टाळण्याचा सल्ला दिला, तर लुफ्थांसाने देखील आपले वेळापत्रक बदलले. अमेरिकेने सर्व व्यावसायिक उड्डाणांना इराणवरून जाण्यास मनाई केली असून, फ्लायदुबई व टर्किश एअरलाइन्सने अनेक उड्डाणे रद्द केली आहेत. इतर महत्वाची पार्श्वभूमी म्हणजे २०२० मध्ये इराणी हवाई संरक्षण यंत्रणेकडून युक्रेन इंटरनॅशनल फ्लाइट वर शत्रू समजून क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला होता. त्यात विमानातील सर्व १७६ प्रवाशांचा मृत्यू झाला. हा प्रकार इराणी हवाई सुरक्षा विषयक चिंतेचे एक महत्वाचे कारण बनला आहे. सध्या इराणमधील परिस्थिती अत्यंत संवेदनशील असून, अमेरिकेकडून संभाव्य हल्ल्याची भीती आणि देशांतर्गत निदर्शने यामुळे आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांसाठी सतर्कता आवश्यक झाली आहे.

## एअर इंडियाचे सिंगापूरला जाणारे विमान परत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** एअर इंडियाची दिल्लीहून सिंगापूरला जाणारी फ्लाइट एआय २३८० गुरुवारी पहाटे तांत्रिक बिघाडामुळे परत दिल्लीला आली. विमानात सुमारे १९० प्रवासी होते. सूत्रांच्या माहितीनुसार, ऑक्झिलरी पॉवर युनिट (एपीयू) कडून आग लागू शकतो, असा इशारा आल्यानंतर विमानाने सुमारे एक तास हवेत उड्डाण करून परत येण्याचा निर्णय घेतला. एअर इंडियाच्या प्रवक्त्यांनी सांगितले की विमान दिल्लीत सुरक्षितपणे उतरले आणि ग्राउंड टीमने प्रवाशांना आवश्यक ती सर्व मदत केली. त्यानंतर पर्यायी विमानाने प्रवाशांना सिंगापूरकडे रवाना केले. प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल एअर इंडियाने दिलगिरी व्यक्त केली आहे. फ्लाइट ट्रॅकिंग संकेतस्थळानुसार, बोईंग ७८७-९ ड्रीमलाइनरने सुमारे एक तास हवेत घालवला आणि गुरुवारी पहाटे १ वाजता दिल्ली विमानतळावर उतरले. विमानातील तांत्रिक समस्येमुळे सुरक्षिततेस प्राधान्य देत वेळेत निर्णय घेण्यात आला, असे प्रवक्त्यांनी स्पष्ट केले.

## आय-पीएसी छापा प्रकरण सर्वोच्च न्यायालयात

# ईडी विरुद्ध ममता संघर्ष तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** कोलकात्यातील राजकीय सल्लागार कंपनी आय-पीएसीशी संबंधित ठिकाणी अंमलबजावणी संचालनालयाने टाकलेल्या छाप्याप्रकरणी गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. हे प्रकरण आता थेट ईडी विरुद्ध मुख्यमंत्री ममता बॅनर्जी असा सत्तासंघर्ष बनले आहे. दरम्यान, ईडीने पश्चिम बंगालचे डीजीपी राजीव कुमार यांच्यासह तीन वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी करणारी नवी याचिका दाखल केली आहे.

ईडीचा आरोप आहे की, या अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी संगनमत करून तपासात अडथळे निर्माण केले आणि पुरावे पळवून नेण्यास मदत केली. याचिकेत डीजीपी राजीव कुमार यांनी यापूर्वी कोलकाता पोलिस आयुक्त असताना ममता बॅनर्जी यांच्यासोबत धरणे आंदोलनात सहभाग घेतल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. या सुनावणीदरम्यान ईडीच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू आणि ईडीचे विशेष वकील जोहेब हुसेन यांनी बाजू मांडली. तर पश्चिम बंगाल सरकार आणि ममता बॅनर्जी यांच्या वतीने वरिष्ठ वकील कपिल सिब्बल आणि अभिषेक मनु सिंघवी हजर होते. सॉलिसिटर जनरल मेहता यांनी आरोप केला की, आय-पीएसी परिसरावर छापे सुरू असताना मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तपासात थेट हस्तक्षेप केला, फायली आणि उपकरणे पळवून नेण्यात आली.

मेहता यांनी सांगितले की, उच्च न्यायालयात सुनावणीसाठी अनुकूल वातावरण नव्हते आणि मोठ्या संख्येने वकील एकत्र आल्याने कामकाजात अडथळे आले. यावर न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठाने ही बाब गंभीर असल्याचे नमूद करत नोटीस जारी करून प्रकरणाचा सविस्तर आढावा घेण्याचे संकेत दिले. सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयात झालेल्या गोंधळाबाबत सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. एएसजी राजू यांनी आपण स्वतः तिथे उपस्थित असल्याचे सांगत घडलेला प्रकार स्पष्ट करण्याची तयारी दर्शवली. त्यावर कपिल सिब्बल यांनीही आपणही त्या वेळी उपस्थित असल्याचे सांगितले. मात्र, न्यायालयाने कोणताही गोंधळ टाळण्याचे निर्देश देत सर्व पक्षकारांना संयम राखण्याचा सल्ला दिला.

दरम्यान, एसजी मेहता यांनी असा आरोप केला की, उच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान एएसजी राजू यांचा मायक्रोफोन वारंवार बंद करण्यात आला. त्यांनी सांगितले की, मूलभूत अधिकारांच्या रक्षणासाठीच ईडी सर्वोच्च न्यायालयात आली आहे. यावर सिब्बल यांनीही आपली बाजू मांडण्याचा आग्रह धरला. सुनावणीदरम्यान सिब्बल यांनी उच्च न्यायालय न्याय देऊ शकत नाही असा उल्लेख केल्यावर सर्वोच्च न्यायालयाने त्यांना फटकारले. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, कोणते शब्द वापरायचे आणि काय मान्य करायचे हे न्यायालय ठरवेल. सिब्बल यांनी ईडीकडून समांतर कार्यवाही सुरू असल्याचा आरोप केला आणि निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेपाचा प्रयत्न झाल्याचा दावाही केला.

## इराणमधून काश्मिरी विद्यार्थ्यांच्या परतीची तयारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर :** इराणमध्ये वाढत चाललेल्या अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जम्मू आणि काश्मीरमधील विद्यार्थ्यांची पहिली तुकडी शुक्रवारपासून मायदेशी परतण्याची शक्यता आहे, अशी माहिती जम्मू-काश्मीर विद्यार्थी संघटनेने दिली. ही परतफेरी इराणी अधिकाऱ्यांच्या मंजुरीवर अवलंबून असून, भारत सरकारने दिलेल्या देश सोडण्याच्या सल्ल्यानुसार ही प्रक्रिया सुरू आहे.

विद्यार्थी, यात्रेकरू, व्यावसायिक आणि पर्यटक अशा सर्व भारतीय नागरिकांना उपलब्ध व्यावसायिक उड्डाणे व अन्य वाहतूक साधनांचा वापर करून इराण सोडण्याचा सल्ला देण्यात आला आहे. जम्मू-काश्मीर विद्यार्थी संघटनेचे राष्ट्रीय संयोजक नासिर खुहेमी यांनी सांगितले की, शिराझ, अरक, टीयूएमएस आणि शहीद बेहेश्ती विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या काश्मिरी विद्यार्थ्यांसह अनेक भारतीय विद्यार्थ्यांनी आधीच तिकिटे बुक केली असून, शुक्रवारपासून त्यांची परतफेरी अपेक्षित आहे.

अमेरिकेकडून संभाव्य लष्करी कारवाईच्या भीतीमुळे काही काळासाठी बंद करण्यात आलेले इराणचे हवाई क्षेत्र पुन्हा खुले करण्यात आले असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना परत येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र गंभीर सुरक्षा धोके, वाहतुकीची मर्यादित साधने आणि दळणवळणातील अडचणी यांमुळे अनेक विद्यार्थ्यांना स्वतःहून देश सोडणे कठीण जात असल्याचे खुहेमी यांनी सांगितले.

सध्याच्या परिस्थितीत जम्मू-काश्मीरमधील सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांसह देशभरातील हजारो विद्यार्थी इराणमध्ये अडकले असल्याचा दावा करण्यात आला आहे. या विद्यार्थ्यांना स्थानिक वसतिगृहे, विद्यापीठाच्या सुविधा, सार्वजनिक वाहतूक आणि नागरी सेवांवर अवलंबून राहावे लागत असून, सुरू असलेल्या नागरी अशांततेत ते अधिक असुरक्षित बनले आहेत. इराणमध्ये अडकलेल्या काश्मिरी विद्यार्थ्यांसह सर्व भारतीय नागरिकांना तातडीने बाहेर काढण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संघटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्याकडे केली आहे.

## बँक फसवणूक प्रकरणी छापे

**कोलकाता :** बँक फसवणुकीच्या प्रकरणाच्या तपासाअंतर्गत सीबीआयने गुरुवारी कोलकात्यात विविध ठिकाणी छापे टाकले. न्यू अलीपूर भागातील एका व्यावसायिकाच्या निवासस्थानी तसेच न्यू टाउन परिसरात ही कारवाई करण्यात आली. सीबीआयची पाच पथके एकाच वेळी शोधमोहीम राबवली. संबंधित कागदपत्रे व इतर महत्त्वाचे साहित्य जप्त करण्यावर भर देण्यात आला आहे. निधीचा प्रवाह आणि त्या निधीचा अंतिम वापर नेमका कुठे झाला, याचा शोध घेण्यात आला.

## हैदराबादमध्ये मंदिर तोडफोडीमुळे तणाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हैदराबाद :** पुरानापुल परिसरातील एका मंदिरात बुधवारी रात्री अज्ञात व्यक्तींनी तोडफोड केल्याने परिसरात तणाव निर्माण झाला. मंदिराचे काही पवित्र साहित्य नष्ट झाले असून स्थानिक नागरिकांमध्ये संताप पसरला. घटनास्थळी त्वरित पोलीस पथक दाखल झाले आणि परिसरात सुरक्षा वाढवण्यात आली.

मंदिराच्या परिसरात झालेल्या तोडफोडीनंतर काही जमावांनी दगडफेक केली, वाहनांचे नुकसान झाले आणि रस्त्यावरील वाहतूक ठप्प झाली. पोलिसांनी लाठीचार्ज करून परिस्थिती नियंत्रणात आणली, तर काही पोलिस कर्मचाऱ्यांना हलके दुखापतींही झाल्या.

हैदराबादचे खासदार असदुद्दिन ओवेसी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी नागरिकांशी संवाद साधत संयम बाळगण्याचे आवाहन केले आणि पोलिसांना आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. ओवेसींनी सांगितले की अफवा पसरवू नयेत आणि समाजात गैरसमज निर्माण होऊ नयेत. राजकीय प्रतिक्रिया देखील उमटल्या आहेत. भाजपच्या नेत्यांनी राज्य सरकारवर टीका केली असून, प्रशासनाने सुरक्षा पुरवली नाही, असे म्हटले. त्यांनी या घटनेसाठी सरकारची जबाबदारी अधोरेखित केली. पोलिसांची पेट्रोलिंग वाढवण्यात आली असून, नागरिकांना तपासात सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## पाणीपुरवठा घोटाळ्याच्या चौकशीत नवा वाद

# आता झारखंडमध्ये ईडी-पोलिस यांच्यात संघर्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**रांची :** पश्चिम बंगालपाठोपाठ आता झारखंडमध्ये अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि राज्य पोलिसांमधील संघर्ष उघडपणे समोर आला आहे. पाणीपुरवठा घोटाळ्याच्या चौकशीदरम्यान ईडी कार्यालयात घडलेल्या कथित मारहाणीच्या आरोपांवरून दोन्ही यंत्रणांमध्ये तणाव निर्माण झाला आहे.

१५ जानेवारी रोजी सकाळी रांची पोलिसांचे पथक मोठ्या ताफ्यासह विमानतळ रोडवरील ईडी कार्यालयात पोहोचले. या कारवाईमागे घोटाळ्यातील आरोपी संतोष कुमार यांनी ईडी अधिकाऱ्यांविरोधात केलेली तक्रार कारणीभूत ठरली आहे. चौकशीदरम्यान ईडी अधिकाऱ्यांनी आपल्यावर हल्ला केल्याचा आरोप कुमार यांनी केला असून, त्यानंतर पोलिसांनी विमानतळ पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०५/२०२६ नोंदवून तपास सुरू केला आहे.

अप्पर चुटिया परिसरातील रहिवासी असलेल्या संतोष कुमार यांनी ईडीचे सहाय्यक संचालक प्रतीक आणि त्यांचे सहाय्यक शुभम यांच्यावर कार्यालयात बोलावून मारहाण केल्याचा, कवटीला गंभीर दुखापत केल्याचा आणि पुरावे नष्ट केल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जखमी झाल्यानंतर त्यांना सदर रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे डोक्याला सहा टाके पडले. रुग्णालयातही आपल्याला धमकावण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.

कुमार यांनी आरोप केला की, ईडी कार्यालयात परत आणल्यानंतर त्यांचा रक्ताने माखलेला टी-शर्ट काढून टाकण्यात आला, नवीन टी-शर्ट घालण्यास भाग पाडले गेले आणि घटनेचा अहवाल वाचू न देता सही घेण्यात आली. तसेच या घटनेची माहिती माध्यमे, पोलिस किंवा वकिलाला दिल्यास पत्नी व मुलांना तुरुंगात टाकण्याची धमकी देण्यात आल्याचाही दावा त्यांनी केला आहे.

या प्रकरणामुळे ईडी आणि झारखंड पोलिसांमधील जुना तणाव पुन्हा उफाळून आला आहे. यापूर्वी बेकायदेशीर खाणकाम आणि साहिबगंज टोल टेंडर प्रकरणावरूनही दोन्ही यंत्रणांमध्ये संघर्ष झाला होता. केंद्रीय एजन्सींसाठी राज्य सरकारने तयार केलेली मानक कार्यप्रणाली ईडीने नाकारली होती, त्यावरूनही वाद निर्माण झाला होता.

दरम्यान, ईडी या पाणीपुरवठा घोटाळ्यात मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यासह उच्चपदस्थ व्यक्तींच्या भूमिकेची चौकशी करत असताना, आता पोलिस ईडी अधिकाऱ्यांच्या वर्तनाची चौकशी करत आहेत. रांची पोलिसांनी पहाटे सहा वाजता कार्यालयात पोहोचून कारवाई केल्याबद्दल ईडीने नाराजी व्यक्त केली असून, ही कारवाई त्रास देण्याच्या उद्देशाने झाल्याचा आरोप केला आहे.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना विरोधी पक्षनेते बाबूलाल मरांडी यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. झारखंडला 'दुसरे बंगाल' बनू दिले जाणार नाही, असा इशारा देत त्यांनी महत्त्वाच्या पुराव्यांशी छेडछाड होण्याची भीती व्यक्त केली. मात्र काँग्रेस नेत्यांनी या वादाला नित्याचा प्रकार ठरवत, कायदा आपले काम करत असल्याचे स्पष्टीकरण दिले आहे.